संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# लोकशाही विषयक अज्ञानाची परिसीमा

**आतापर्यंतच्या** निवडणुकांपेक्षा यावेळच्या लोकसभा निवडणुकीचा जरा जास्तच गाजावाजा होतो आहे. त्यातही लोकशाहीचा उत्सव असे अलंकारीक वर्णन करून मतदारांनी तो अत्यंत भक्तीभावाने साजरा करावा अशी या राजकारण्यांची इच्छा दिसते. उत्सव म्हटला की सगळ्यांमध्येच उत्साह संचारतो. आणि मग तिथे बुध्दी, तर्क विश्लेषण याला फारशी जागा राहात नाही. केवळ श्रध्दा किंवा भक्ती याच्या जोरावर हे उत्सव साजरे होतात. लोकशाहीच्या उत्सवाचेही असेच उत्साहीकरण केले जात आहे. परंतु या तथाकथित उत्सवाचा जरा कठोरपणे अभ्यास केला तर याच लोकशाहीतल्या अनेक अभ्यासकांना स्वतःच्याच हाताने स्वतःचा कपाळमोक्ष करून घ्यावा लागेल म्हणजेच लोकशाहीची ही दुर्दशा पाहून त्यांना भिंतीवर डोके आपटून घेण्याशिवाय पर्याय राहाणार नाही. देशाची लोकसंख्या सव्वाशे कोटी आहे त्यापैकी नव्वद कोटी प्रत्यक्ष मतदार आहेत. यातील पन्नास टक्क्यापेक्षा जास्त मतदारांना लोकशाही म्हणजे नेमके काय याचा थांगपत्ता नसतो. लोकसभा निवडणुकीत निवडून येणारा खासदार असो की आमदार तिथल्या मतदार संघांची रचना कशी असते. विधानसभेसाठी निवडला जातो तो आमदार असतो. एवढेच नव्हे तर महानगरपालिका निवडणूक किंवा लोकसभा विधानसभा निवडणूक यामधला नेमका फरक काय? लोकसभा , विधानसभा यांचा कार्यकाल किती असतो? अशा असंख्य प्रश्नांची उत्तरे अगदी शिकल्या सवरलेल्या लोकांनाही देता येत नाहीत. आपला प्रपंच, नोकरी, व्यवसाय अशा राहाटगाडग्यात अडकलेला माणूस राजकारणापासून चार हात लांबच असतो. परंतु ज्या देशात किंवा समाजात तो राहातो त्या समाजव्यवस्थेचे संचालन करणाऱ्या या यंत्रणांविषयीसुध्दा त्याला पुरेशी माहिती नसते. आज देखील महाविद्यालयांमधून विद्यार्थ्यांशी जर प्रश्नोत्तरे केली तर त्यातल्या पन्नास टक्के विद्यार्थ्यांना खासदार आणि आमदार यांच्यातला फरक सांगता येणार नाही. विधानसभा, विधानपरिषद यातलाही त्यांना फरक माहीत नसतो. खासदार कसे निवडून जातात याचीदेखील पुरेशी कल्पना नसते. केवळ निवडणुकीमध्ये आपल्याला मतदान करायचे आहे. आणि प्रचाराचे वारे ज्या दिशेने वाहात असतील त्याचा अंदाज घेऊन किंवा जो पक्ष नेहमी आपल्या संपर्कात असतो त्याला मतदान करून मोकळे व्हायचे आहे एवढाच त्यांचा या तथाकथित लोकशाहीशी संबंध येतो.

**आमदार खासदार यातला फरकच माहीत नाही**

ही जर देशातील पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त नागरीकांची परिस्थिती असेल किंवा त्यांचे राजकारणाविषयी किवा लोकशाहीविषयीचे सामान्य ज्ञानही अती सामान्य असेल तर ही लोकशाही का आणि कशी टिकून आहे हेही लक्षात येते. लोकशाहीचा हा निरक्षर महोत्सव देशाचे भवितव्य घडवतो. असे मानणे ही तर आणखीनच सर्वात मोठी अंधश्रध्दा म्हणावी लागेल. आजचे माहिती तंत्रज्ञानाचे युग असूनही किंवा या लोकशाहीच्या उत्सवात ८० टक्क्यापेक्षा जास्त याच तंत्रज्ञानाचा वापर केला जात असूनही एकूणच देशाच्या लोकशाही अथवा निवडणूक प्रक्रियेविषयी मतदारांमध्ये असलेले हे अज्ञान अतिशय चिंताजनक ठरते. फेसबुक , ट्विटर, इन्स्टाग्राम , इंटरनेट, व्हॉटसअप, ब्लॉग अशा एक ना अनेक सामाजिक माध्यमांचा वापर करून प्रचाराची रणधुमाळी सुरु आहे. पण या सोशल मिडीया वापर करणाऱ्यांनासुध्दा लोकसभा आणि राज्यसभा यांच्यातला नेमका फरक काय अथवा विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीतले नेमके अंतर काय हे सांगता येणार नाही. ही तर झाली सामान्य माणसाची परिस्थिती परंतु अगदी निवडणुकीला उमेदवार म्हणून उभे असलेल्या अनेक उमेदवारांची यापेक्षा वेगळी परिस्थिती नाही. पक्षाने उमेदवारी दिली किंवा पैशाच्या जोरावर उमेदवारी मिळाली म्हणून निवडणूक लढवणाऱ्यांची संख्याही भरपूर असल्याचे दिसून येईल. पण आपण जी निवडणूक लढवत आहोत त्या लोकसभा अथवा विधानसभेची कामकाज पध्दती काय असते. आपण खासदार किंवा आमदार म्हणून निवडून गेल्यानंतर आपल्याला कोणती कर्तव्ये किंवा जबाबदाऱ्या पार पाडायच्या आहेत याची त्यांना सुध्दा धडपणे जाणीव नसते. तरीदेखील राजकारणाच्या बाजारामध्ये प्रचाराच्या जोरावर काहीही विकले जाते त्या पध्दतीने हे उमेदवारही निवडून येतात. जगातली सर्वात मोठी लोकशाही असा डांगोरा पिटत असताना त्यातला पोकळपणादेखील लक्षात आला पाहिजे.

**अज्ञानी लोकांचे प्रतिनिधी**

आम्ही हे छातीठोकपणे सांगू इच्छित आहोत की कोणत्याही तटस्थ स्वयंसेवी संस्थेने याचे सर्वेक्षण करावे आणि त्याची प्रचिती घ्यावी. जाहीर सभांना पैसे देऊन जी माणसे आणली जातात. त्यांच्याबाबतीत हा अनुभव नेहमी येत असतो. आपल्याला कोणत्या उमेदवारासाठी आणले गेले आहे. याचे त्यांनाही भान नसते. त्यांचा संबंध केवळ पैशाशी आणि आपल्याला घेऊन येणाऱ्या घरापर्यंत सोडणाऱ्या वाहनाशी असतो. सहजपणे ज्या प्रदेश कार्यालयांमधून प्रचाराचे तथाकथित विवेचन केले जाते. किंवा नियंत्रण केले जाते. त्या कार्यालयात काम करणाऱ्या कर्मचारी वर्गाला जरी लोकसभा निवडणूक म्हणजे काय किंवा विधानसभा निवडणुकीत कोणता फरक आहे. आमदार खासदारांची कामे कोणती असतात. असे जुजबी प्रश्न जरी विचारले तरी राजकीय पक्षांच्या कार्यालयात वर्षानुवर्षे काम करणाऱ्यांपैकी अनेकांना याची उत्तरे देता येत नाहीत किंवा सर्वात मोठ्या लोकशाहीचे सर्वात मोठे अज्ञानही याच देशामध्ये आपल्याला पाहायला मिळू शकते. कदाचित याच राजकीय अज्ञानाचा पुरेपूर फायदा सर्व राजकीय पक्ष आणि नेते घेतात. आणि आपल्याला पाहिजे तशा आणि पाहिजे तितक्या पोळ्याही भाजून घेतात. सामान्यपणे आपण ज्याला निवडणूक म्हणतो त्या निवडणुकीत विजयी होणारे प्रतिनिधी खऱ्या अर्थाने अज्ञानी जनतेचेच प्रतिनिधीत्व करतात. असे नाईलाजाने म्हणावे लागते. म्हणूनच निवडणुकांच्या निमित्ताने लोकांचे लोकशाहीविषयक प्रबोधन होण्याची खूप आवश्यकता आहे. तरच या देशातील लोकशाही व्यवस्था खऱ्या अर्थाने परिपक्व किंवा भक्कम होऊ शकेल.